Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - I,
January - March - 2020
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | बदलत्या पर्यावरणाचे मराठी साहित्यातून झालेले चित्रण : कादंबरी<br>**प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर** | १-९ |
| २ | पर्यावरण चळवळींचे ऐतिहासिक मूल्य चिंतन<br>**श्री. अनिल महादेव बोराडे** | १०-१६ |
| ३ | महाराष्ट्रातील पर्यावरण संवर्धनात कृषी पर्यटनाचे योगदान<br>**प्रा. अनिल नि. शिंदे** | १७-२४ |
| ४ | संत साहित्यातील प्रतिबिंबीत पर्यावरण विचार : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. धनेश मधुकर हरड** | २५-३१ |
| ५ | जैवविविधता : संरक्षण व संवर्धन<br>**डोंगरजाळ भाग्यशाली रामसिंग** | ३२-३५ |
| ६ | शाश्वत विकास आणि भारतातील पर्यावरण चळवळी<br>**डोंगरजाळ सरिता रामसिंग** | ३६-३९ |
| ७ | अहमदनगर जिल्ह्यातील फळ विक्रेत्यांचे अर्थशास्त्र<br>**डॉ. सुहास आव्हाड**<br>**ईश्वर अरूण म्हस्के** | ४०-४३ |
| ८ | भारतातील पर्यावरणवादी चळवळ<br>**प्रा. काळुराम दामू शिंदे** | ४४-४७ |
| ९ | तुकडोजी महाराज यांचे शाश्वत कृषी विकास संकल्पनेतून पर्यावरण विकास संदर्भातील विचार आणि सूचविलेले उपाय<br>**शुभांगी विजयराज मोहोड** | ४८-५४ |
| १० | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे अध्ययन<br>**डॉ. अतुल हंसराज साळुंके** | ५५-५७ |
| ११ | बदलत्या पर्यावरणाचा आगरी मराठी कवितेवर झालेला परिणाम : एक आकलन<br>**डॉ. संदीपान श्रीमंत नवगिरे** | ५८-६३ |
| १२ | नाबार्ड बँकाचे ग्रामीण शेतकऱ्यांची विकासातील योगदान : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. बिराजदार एस. एम.** | ६४-६८ |

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १. बदलत्या पर्यावरणाचे मराठी साहित्यातून झालेले चित्रण : कादंबरी

**प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर**
मराठी विभाग प्रमुख, कॉ. ए. सो. लक्ष्मी - शालिनी महिला महाविद्यालय, पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड.

**प्रास्ताविक**

साहित्य आणि पर्यावरण यातल नातं आपण जाणतोच साहित्यिकाचं पहिल प्रकटीकरण जेव्हा झालं, तेव्हापासून हे नातं विकसित होत आलं आहे. एखाद्या लेखक—कवींच्या विकसनासाठी स्वाभाविक पर्यावरणाची आवश्यकता असते. म्हणून वाङ्मय आणि पर्यावरण यांच्यातील स्वाभाविक नातेसंबंधाचा शोध होणे उद्‌बोधक ठरते. मानवाचं विकसन जसं होत आहे आणि मनुष्य मात्रांची ही पर्यावरणविषयक जाणीव व्यामिश्र होत चाललेली आहे. आपण पाहू शकतो प्रगतीशील तंत्रज्ञानांच्या हया काळात शेतीचे होत चाललेले व्यवसायीकरण, खेडोपाडी पोहोचणारी औद्यागिक क्रांती, लोकसंख्येची प्रचंड वाढ आणि त्यामंळे होत जाणारा निसर्ग संपत्तीचा क्षय या सर्व कारणांनी पर्यावरणांचे संतुलन बिघडत चालले आहे. आणि म्हणूनच आधुनिक युगात पर्यावरण हा एक जागतिक स्तरावरचा अत्यंत महत्वांचा प्रश्न बनला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पर्यावरणाच्या प्रश्नांला केंद्रस्थानी ठेवून नव्या जाणिवेनं त्याचा विचार करण्याची सामाजिक प्रबोधन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

दुसऱ्या महायुध्दानंतर विज्ञान आणि तंत्रज्ञानांच्या क्षेत्रात मानवाने झपाटयाने प्रगती केली. त्याचे काही चांगले आणि वाईट परिणाम माणसाच्या आणि इतर जीवांच्या जीवनावर झाले. अणुविस्फोट, किरणोत्सार याचे दुष्परिणाम आपण सारेजण पाहतो आहोत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे औद्यागिकीकरण वाढले. उदरनिर्वाहाच्या गरजेपोटी खेडयातील माणूस शहराकडे ओढला जाऊ लागला. आणि साहजिकच खेडी ओस पडू लागली. शहरे प्रदुषणाने व झोपडपट्टयांनी वेढली गेली. मानवाच्या जीवनात तंत्रज्ञानाने प्रवेश केल्यापासून आपण पाहतो आहोत की पाखरं देशांतराला गेली. धरण—बंधारे बांधल्यानं नद्यांची थारोळी झालीत. वायूप्रदूषणाने झाडांचे, प्राण्यांचे आणि कृमिकिटकांचे वंश नष्ट होत आहेत. प्रचंड लोकसंख्या वाढीतून शहरांत माणसांना राहायला जागा नसल्यांने डोंगर टेकडया भुईसपाट झाल्यात. समुद्रकिनाऱ्यांवरती माणसांनी अतिक्रमण करून निसर्गावर ताबाच मिळविला आहे. आणि यामुळे समुद्राच्या किनारपट्टया संकोचून गेल्यात. जिथं जिथं. माणसांची स्वार्थप्रेरित बुध्दी बोकाळली आहे.

या साऱ्या पर्यावरणाच्या असमतोलाच्या झळा संवेदनशील माणसांना सोसाव्या लागत आहेत. वरचेवर त्याचे पर्यावरणविषयक भाव तीव्र होत जाताना विनोबांच्या विधानांचे स्मरण व्हावे ते म्हणत ''बुध्दीचा सर्वात मोठा पराभव, तिचा स्वार्थासाठी उपयोग होणे हा होय'' याची प्रचीती आपण घेत आहोत.

साहित्य हे प्रबोधनासाठी एक प्रभावी माध्यम आहे. पर्यावरणीय संस्कार पर्यावरणीय जाणीव जागृती याकरिता वाङ्मयीन प्रतिसाद फार महत्वाचा आहे. निसर्गाच्या भव्यतेचे त्यातील घटकांच्या सहसंबंधाचे प्रभावी दर्शन साहित्यातून घडले पाहिजे. ग्रंथलेखनामागचा हा हेतू कोणत्याही संवेदनशील वाचकाला दृष्टीआड करता येण्यासारखा नाही.व्यंकटेश माडगूळकर हे पर्यावरणीय भान असणारे १९६० नंतरच्या काळातील एक महत्वाचे लेखक आहेत. १९६० पूर्व कालखंडात 'बनगरवाडी' ही माणदेश या प्रदेशाचे अवघे पर्यावरण साक्षात करणारी कादंबरी लिहून त्यांनी या दिशेने एक महत्वाचे पाऊल उचलले होते. १९६० नंतर 'वावटळ' (१९६४), 'कोवळे दिवस' (१९७९), 'सत्तांतर' (१९८२), 'करूणाष्टक' (१९८२) हे कादंबरी वाङ्मय त्यांनी निर्माण केले. यांपैकी 'कोवळे दिवस' व 'सत्तांतर' या दोन कादंबऱ्यांतून माडगूळकरांनी पर्यावरणाचे चित्र उभे केले आहे.

'वावटळ' या कादंबरीत निवेदनाच्या ओघात एखाद्या झाडाचे निसर्गघटकाचे एकदोन वाक्यांत वर्णन येते. पण त्यांतूनही माडगूळकरांचे पर्यावरणाविषयीचे अकृत्रिम प्रेमच दिसून येते. ''आजूबाजूला उघडावोडका माळ होता समोर धुळीने भरलेली सडक होती... फाटयावर कुणी पुण्यवंताने लावलेले एकुलते एक नांदुरकीचे बुटके झाड होते''. (वावटळ, पृ.२९) असे म्हणताना झाड लावणारा, झाड जगवणारा कुणीही असो, तो पुण्यवंत असतो, हे सूचित करीत त्याविषयीचा पूज्यभावच त्यांनी व्यक्त केला आहेसदानंद देशमुख यांची 'बारोमास' सुरेखा शहा यांची 'जोहड' या कादंबऱ्या पर्यावरणीय भान जागवणाऱ्या प्रातिनिधिक कादंबऱ्या आहे. वृक्षसंवर्धनाला व पर्यावरण रक्षणाला चालना देणारा 'बारोमास' मधला विचार एका निसर्गप्रेमी शेतकऱ्याचा आहे 'ज्यांच्या दारी झाडं होती त्यांनी आर्थिक अडचणीला बळी पडून विकली' आधी शेतातली मग दारातली खरं म्हणजे झाडांची खरी गरज शिवारालाच. तिथल्या मातीची धूप होऊ नये म्हणून जमिनीना पोत टिकून रहावा म्हणून झाडं हवीचं.

'जोहड' मधील पाणी प्रश्न व त्या अनुषंगाने उभारलेल्या एका पर्यावरणवादी विचारांच्या कार्यकर्त्यांच्या लोकोत्तर कार्याची कहाणी आहे. प्रवीण बांदेकरांच्या 'चाळेगत' या कादंबरीमध्ये पर्यावरणाच्या – ऱ्हासाचे अस्वस्थ अवकाळचित्र रेखाटणाऱ्या कादंबरीची नोंद डॉ. पुजारींनी खूप जाणतेपणानं घेतलीय. पुजारी लिहितात – 'हत्तीचा कळप गावात घुसल्याचा एक प्रसंग. 'चाळेगत' मध्ये चित्रीत केला आहे. हत्ती गावात घुसतात आणि शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान करतात. अशा तक्रारीचा सूर या चित्रणातून व्यक्त झाला आहे. तो कोकणातील कुळवाडयांच्या रहिवाशांच्या दृष्टीने न्याय असेल परंतु वन्य जिवांवर अन्याय करणारा आहे. पर्यावरणातील विचारांना व एकूणच पर्यावरणीय जाणिवेला तो छेद देणारा आहे'. या मार्मिक नोंदीमुळे वाचकांचे पर्यावरणविषयक भान अधिक तीव्र व उत्कट होते.

साठोत्तरी मराठी कादंबरीतील पर्यावरणीय अनुभव व पर्यावरणीय जाणीवेचा आविष्कार करणाऱ्या 'हिंदू : जगण्यांची समृध्द अडगळ' – भालचंद्र नेमाडे, गोतावळा, माउली – आनंद यादव, झाडाझडती, पांगिरा, राघववेळ, मेंढका, अरण्यकांड, बारोमास, जोहड, एसईझेड, चक्रीवादळ, कापूसकाळ, चाळेगत इ. कादंबऱ्यासंबंधी पर्यावरणीय वास्तवाला कलारूप देण्यात आलेल्या प्रतिभेच्या सामर्थ्याबाबत पुजारी यांनी

मार्मीक भाष्य केले आहे. पर्यावरण केवळ मनुष्यमात्रांचनं नसून साऱ्या जीवनमात्रांचनं आहे. पर्यावरणीय संवेदन हे प्रादेशिक, प्रांतीय किंवा राष्ट्रीय असं नाही. जी शासकीय–प्रशासकीय पातळीवरून गबवावी लागते. पर्यावरण आपल्या सर्वांच्या अस्तित्वांशी जोडलेले आहे. कारण आपण ज्या पंचमहाभूतांपासून जोडलेले आहोत. ते पर्यावरणच आहे. पर्यावरणीय भावगर्भता वसंत आबाजी डहाके एक लहानशा कवितेतून किती समर्थपणे व्यक्त झाली आहे.

'झाड तोडायचे, कापायचे
लगदा करायचा, कागद बनवायचा
मग वाचायचे.
एवढा खटाटोप कशासाठी
सरळ
झाडच वाचावे!
झाड वाचतांना
मला तुझाही अर्थ
उलगडत जातो.

साठोत्तरीपूर्व दोन दशकांमध्ये मराठी कादंबरीत प्रादेशिक जाणिवा प्रबळ आणि प्रभावी झाल्या होत्या. र.वा.दिघे, श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर या कादंबरीकारांनी आपल्या अनुभवाचा प्रदेश त्याच्या अंगभूत वैशिष्ट्यांसह चित्रित केला. महाराष्ट्रातील विविध भूप्रदेश या कालखंडात साहित्यातून चित्रित झालेले दिसतात. र.वा.दिघे यांच्या कादंबऱ्यांत कोकण, श्री.ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांत हर्णे, श्रीवर्धन, मुरूड, दापोलीचा परिसर, गो.नी.दांडेकरांच्या कादंबऱ्यांत कोकणच्या परिसरासह उर्वरित महाराष्ट्र प्रदेश, तर व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबऱ्यांतून माणदेश चित्रित झाला आहे. त्यानंतर साठोत्तरी कालखंडात रा.रं.बोराडे यांनी मराठवाडा, रणजित देसाई, आनंद यादव यांनी पश्चिम महाराष्ट्र, उध्दव शेळके, आशा बगे, सदानंद देशमुख यांनी विदर्भ असा भूप्रदेश मराठी कादंबरीच्या क्षेत्रात आणला, याखेरीज शेष महाराष्ट्रातील महानगरे, या महानगरांच्या पाठीपोटी वाढलेल्या झोपडवस्त्या, लहान मोठी शहरे, खेडी असे बहुविध स्वरूपाचे पर्यावरण मराठी कादंबरीत स्थान मिळवून राहिले आहे. या सर्व प्रदेशांबाबत पर्यावरणासंबंधीचा अनुभव कादंबरीकारांनी शब्दबध्द केला आहे,

व्यंकटेश माडगूळकरांच्या'वावटळ' या कादंबरीत निवेदनाच्या ओघात एखाद्या झाडाचे निसर्गघटकाचे एकदोन वाक्यांत वर्णन येते. पण त्यांतूनही माडगूळकरांचे पर्यावरणाविषयीचे अकृत्रिम प्रेमच दिसून येते. ''आजूबाजूला उघडाबोडका माळ होता समोर धुळीने भरलेली सडक होती... फाटयावर कुणी पुण्यवंताने लावलेले एकुलते एक नांदुरकीचे बुटके झाड होते''. (वावटळ, पृ.२९) असे म्हणताना झाड लावणारा, झाड जगवणारा कुणीही असो, तो पुण्यवंत असतो, हे सूचित करीत त्याविषयीचा पूज्यभावच त्यांनी व्यक्त केला आहे.

'कोवळे दिवस' मध्ये माडगूळकरांनी पार्श्वभूमीसारखा पर्यावरणाचा उपयोग करून घेतला आहे. त्यातूनही ग्रामीण महाराष्ट्राच्या भौगोलिक पर्यावरणाचे चित्र साकारण्यात ते यशस्वी झाले आहेत. 'रस्त्याकडेच्या झाडांवर झोपलेली पाखरे' (पृ.१७), मक्याच्या पिवळ्या शेतावरून क्षितिजाकडे झेपावणारा कावळ्यांचा थवा (पृ.२१), नेपतीत लागलेली मधाची पोळी (पृ.४६), हिरव्या रानात चरणारी पांढरी शुभ्र हरिणी (कालवड), तिच्या मागं तुरूतुरू धावणारे गायबगळे (पृ.४८), दर तीनचार वर्षांनी एकदा दुष्काळाची झळ सहन करावी लागत असली तरी पशुपक्ष्यांचे जीवन आनंदी होते, निसर्ग आणि माणूस यांच्यात जिव्हाळा होता. जवळीक होती. लोकजीवन आणि वन्यजीवन यात दुरावा नव्हता, हे लक्षात येते.

'करूणाष्टक' मध्ये आजीच्या संबंधीची एक आठवण आली आहे. ती पर्यावरणापासून तुटलेल्या जिवाची कशी केविलवाणी स्थिती होते याचा अनुभव मांडते. माडगूळकर लिहितात, ''आमच्या गावी होतो, तोवर आजी चांगली होती. नोकरीच्या हया गावी आलो आणि ती गप्प झाली. तिच्या ओळखीचे गावकऱ्यांचे, गावातल्या म्हाताऱ्या बायकांचे चेहरे तिला दिसेनात. गाई—गुरांचे आवाज तिला ऐकू येईनात. जवळपास कुठं हिरवं रान दिसेना. सकाळी कोंबडयांची बांग ऐकू येईना. दळणाचे, मोटेचे आवाज कधी कानी पडेनात. त्यामुळं तिचा चेहरा सदा केविलवाणा आणि डोळे भेदरलेले दिसू लागले''. (करूणाष्टक, पृ.११) जुन्या माणसांचे पर्यावरणाशी असणारे नाते असे दृढ होते, ते तुटता तुटत नसे, व्यक्ती पर्यावरणापासून तुटली तर ती अधिकच उदास, केविलवाणी वाटते. पर्यावरण आणि माणूस यांच्यातील भावबंधाचे माडगूळकर असे चित्रण करतात.

'हिंदू : जगण्याची समृध्द अडगळ' या कादंबरीमध्ये पर्यावरणीय जाणीव तुलनेने उत्कट स्वरूपात व्यक्त झाली आहे. ''वाऱ्याची वाट पाहा, पावसाची वाट पाहा, उन्हाचीही वाट पाहा''. (हिंदू : जगण्याची समृध्द अडगळ, पृ.६४) ही महाराष्ट्राच्या पर्यावरणाची ओळख नेमाडे प्रारंभीच नोंदवतात. आपल्याकडील वृक्षतोड, वन्यजीवांची हत्या इंग्रज अधिकाऱ्यांनी आणि त्यांच्या धोरणांनी कशी केली याचा तपशील 'हिंदू' मध्ये येतो. मोरगावच्या जंगलात कोंबडयांसारख्या वावरणाऱ्या मोरांच्या कत्तलीही इंग्रज अधिकाऱ्यांनी जेवणाच्या पार्टयांसाठी केल्या. पूर्वी अंगणात कन्होडे वाळत घातले तरी मोरांच्या झुडींच्या—झुंडी येऊन ते फस्त करायचे. वाघरान तापीच्या दोन्ही काठावर मोरगावपासून वाघूर नदीनं वर अजिंठयापर्यंत पसरलेले होतं आणि त्याला कोणी पार करू शकत नसे कारण वाघ येथे कुत्र्याप्रमाणे फिरत असायचे. पण त्यावरच इंग्रजांनी रेल्वे टाकली. त्यासाठी हे जंगल तुटलं. असं इतिहासाचे उत्खनन नेमाडे यांनी केले आहे.

भिल्लांच्या बंडांमुळे त्रस्त झालेल्या इंग्रजांना हिंदुस्थानच्या मधोमध असलेला सातपुडयाच्या विस्तीर्ण घनदाट सागवानाचा प्रदेश धोक्याचा वाटत होता. त्यामुळे रेल्वेच्या स्लीपरांसाठी लाखो सागांची झाडे तोडून वापरण्याची कंत्राटे इंग्रज कंपन्यांना मिळाली आणि डोंगर भुंडे झाले... रेल्वे इंजिनात टाकण्यासाठी कोळसा पाडणाऱ्या कंत्राटदारांनी जंगलात वणवे पेटवून आपल्यासाठी कोळसा उपलब्ध करून घेतला... या वनविध्वंसाचा परिणाम वाघाच्या डरकाळया बंद होण्यात झाला. (हिंदू : जगण्याची समृध्द अडगळ, पृ.१०३) पर्यावरण नाशाची अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी नेमाडे पुरवतात ते पर्यावरणीय भानामुळेच.

पर्यावरणाचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे. त्याची झळ मनुष्याला बसत आहेच, परंतु पशू–पक्षी व अन्य जीवसृष्टीलाही त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. संपूर्ण पृथ्वीवर व अवकाशावरही केवळ आपलीच सत्ता आहे असा भ्रम मानवाने करून घेतला आहे. त्यामुळे अन्य जीवांचे जगणेही दुष्कर झाले आहे. त्यांनाही जगण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे त्यांच्या वर्तनातही बदल होत असलेले दिसत आहेत. भालचंद्र नेमाडे यांच्या नजरेतून हे वास्तव सुटत नाही. हे पर्यावरणीय वास्तव ते चित्रित करतात, ते असे, ''काटेरी बाभळींचा रस्ता काही कमी सुंदर नसतो. बेगमपुऱ्यामागे विद्यापीठाच्या लायब्रीकडून येताना प्राचीन मोटं तळं होतं, त्याचं पाणी आटलं. डोंगराच्या पायथ्याखाली वंशपरंपरा नेमानं हिवाळ्यात येणारे लांब शेपटयांचे सारस पक्षी त्या वर्षी आक्रोश करत घिरटया घालत पुढे निघून गेले. त्यांचे वारगाचे वड तलाव नाहीसे झाले. एका सूर्यास्ताच्या लाल पार्श्वभूमीवर उरलेल्या एकाच वटवृक्षावर रात्रभर बसता यावं म्हणून शेकडो सारस पक्षी फांदीफांदीवरून एकमेकांना लोटत आहेत, ढकलत आहेत, हे दृश्य खंडेरावच्या स्मृतिगुहेत कायमचं चिणलं गेलं आहे.'' (हिंदू : जगण्याची समृध्द अडगळ, पृ.४७९)

विश्वास पाटील यांनी 'पांगिरा' (१९९०), 'झाडाझडती' (१९९१), 'चंद्रमुखी' (२००४) या वेगळया विषयांवरील सशक्त कादंबऱ्यांची निर्मितीह केली आहे. यातील 'पांगिरा' 'झाडाझडती' या कादंबऱ्या पर्यावरणीय संवेदनाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत.

'पांगिरा' मध्ये बदलत्या ग्रामजीवनाचे दर्शन घडते, त्याप्रमाणेच पर्यावरणीय प्रश्नांकडे ही कादंबरी लक्ष वेधते. रानशिवारातली डोंगरातली प्रचंड वृक्षतोड, नगदी पिकांसाठी पाण्याचा होणारा गैरवापर यांसारखे पर्यावरणाचे संतुलन बिघडवणारे विषय 'पांगिरा' त आले आहेत. पर्यावरणीयदृष्ट्या हे भयावय वास्तव विश्वास पाटील यांनी या कादंबरीत प्रभावी रीतीने मांडले आहे. ठेकेदारांच्या कुऱ्हाडी जंगलाच्या मानगुटीवर नाचू लागल्या होत्या. पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न गावोगाव गंभीर बनत चालला होता. वीज इंगळ्यासारखी रानाला डसली आणि भूमी अधिकाधिक उत्पन्न देणारे साधन बनली, कूपनलिका व विहिरींनी धरणीची चाळण केली. मळेकरी नगदी पिकाला सोकावले आणि भूमीचे शोषण सुरू झाले. भूगर्भातील पाण्याचा उपसा मोटारीने होऊ लागला. पर्यावरणाच्या परवडीचे पर्व सुरू झाले. 'पांगिरा'त हे सगळे कलानुभव बनून प्रकटले आहे.

'पांगिरा' त पांगिरा या ग्रामनामाविषयी कादबरीतील अण्णा जे सांगतात त्यातून महाराष्ट्रातील खेडया–पाडयांची पर्यावरणीय समृध्दताच अधोरेखित झाली आहे. भिकुअण्णा म्हणतात, ''साहेब, स्वराज्य मिळायच्या वक्ताला गावाच्या आजू–बाजूला केवढं दांडगं जंगल होतं ! झाडाझाडुऱ्यानं गावामागचा यमाईचा डोंगर भरलेला. आमच्या लहानपणी माळाला आम्ही सुरपारंब्या खेळायला गेलू की मोरलांडूर नाचायची. वाघाच्या डरकाळयांवर डरकाळया ऐकल्यात या कानांनी ! आता साऱ्या माळामुराडानं कुत्री भुंकतात.'' (पांगिरा, पृ.१२) जंगल व वन्यप्राणी यांचा असा अनुभव तेव्हा खेडुतांना आपसुक मिळत असे. आता हे वैभव हरवले. 'आता साऱ्या माळामुरडानं कुत्री भुंकतात'. या अखेरच्या विधानातून विद्यमान पर्यावरणीय वास्तव कलात्मक रूपात प्रकटले आहे.

धरण की मरण : 'झाडाझडती' ही विश्वास पाटील यांची कादंबरी पर्यावरणीय संवेदनेच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. धरणाखाली गेलेल्या एका भूप्रदेशाची कथा ती मांडते. लाडूबाच्या डोंगरउताराला वसलेले हजार–बाराशे लोकवस्तीने जांभळी बुद्रुक गाव. त्याचा परिसर हा या कादंबरीत आलेला प्रदेश. हिरव्या झाडांच्या गर्दीत हरवलेल्या या गावाच्या मातीत पेरू–केळीच्या अनेक बागा अस्संगत. बागांना वरचेवर पाणी सोडल्याने रानाच्या अंगातून गारठा निघत नसे. जांभळी गावदरीला असलेल्या मारूतीच्या देवळाभोवती चिंचेचे माकडे नाचताहेत. असे समृध्द पर्यावरण या गावाला लाभलेले. दृकप्रत्यय देईल असे या गावाचे चित्रण सुरूवातीला या कादंबरीत येते. पण धरणासारख्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने राबविलेल्या योजनांमुळे येथील पर्यावरणीय प्राकृतिक मूल्ये नष्ट होत राहतात, सर्वसामान्य मनुष्यजीवनाची त्यामुळे फरफट होते, याचा विलक्षण प्रत्ययकारी करूण अनुभव या कादंबरीत प्रकट झाला आहे.

सदानंद देशमुख हे विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात उदयाला आलेले एक सशक्त कादंबरीकार आहेत. 'तहान' (१९९८) व 'बारोमास' (२००२) या दोन कादंबऱ्यातून त्यांनी आपल्या प्रतिभासामर्थ्याचा प्रत्यय दिला आहे. सदानंद देशमुख यांना सभोवतालच्या ओल्या–सुक्या पर्यावरणाने लिहिते केले आहे. निसर्गाच्या लहरीपणाबद्दल नेहमी तक्रार केली जाते, परंतु मानवाच्या निसर्गविरोधी भूमिकेमुळे पर्यावरणीय समस्यांनाच खतपाणी घातले जात आहे, हे पर्यावरणीय भान सदानंद देशमुखांनी आपल्या कादंबऱ्यांतून मांडले आहे.

'तहान' मध्ये शारीरिक व मानसिक तृष्णेची अनेकविध रूपे पाहायला मिळतात. पण पाणीटंचाई ही या कथानकाची मध्याधार आहे, हे मान्य करायला हवे. गेल्या काही दशकात पाणीटंचाईच्या समस्येने खेडयापाडयात उग्र रूप धारण केलेले पाहायला मिळते. पाणीटंचाईची समस्या ही पर्यावरणीय असंतुलनातूनच निर्माण झाली आहे. या समस्येने मानवी जीवनाप्रमाणेच पशुपक्षी, झाडे, पिके शेतजमिनी या सगळयांचीच होरपळ होते. पाण्यासारखी पंचमहाभूतांपैकी एक शक्ती केवळ क्रय–विक्रयाची, राजकारणाची, स्वार्थाची, नागवीची शोषणाची वस्तू होऊन बसते तेव्हा जीवन कसे विरूप होते, याचे वास्तव चित्र 'तहान' मध्ये पहायला मिळते.

बदललेले पर्यावरणाचे स्वरूप, मानवाला निसर्ग ओरबाडण्याची वृत्ती हे पाणीटंचाईचे मुख्य कारण देशमुख नोंदवतात आणि पावसाने का पाठ फिरवली असेल, या प्रश्नाभोवती मन आपसूकच विचार करू लागते. अशा रीतीने पर्यावरणाच्या असमतोलपणाकडे देशमुखांनी लक्ष वेधले आहे.

'बारोमास' मधील नायकाची, एकनाथ तनपुरेची व्यक्तिरेखा ही एका शिक्षित शेतकऱ्याची आहे हे खरे, परंतु, वस्तुतः ती एका विवेकी पर्यावरणवाद्याची देखील आहे, असे म्हणावे लागेल. त्याचे भूमीवर, झाडांवर पशू–पक्ष्यांवर, अवघ्या निसर्गावर, पर्यावरणावर मनस्वी प्रेम आहे. त्याची दृष्टी पर्यावरणवाद्याची आहे. बांधावरचं बेहडयाचं झाड मधुकरने शकूर मौलाला विकल्यानंतर तो उदास होतो. त्याची ही भावावस्था 'बारोमास' मध्ये देशमुखांनी अनेकवेळा रेखाटली आहे. "सोनखाशीत दोनच झाडं उरली होती. एक साईचं अन् बेहडयाचं. आपण वखर हाणायला गेलो तर वावर भलतंच भुंड भुंड ! घरातला माणूस मेल्यानंतर जसं घर होते तसं. झाडाजागी मोकळं आभाळ दिसलं. अन् आपण भलतेच उदासलो". एकनाथाला झाडाजागी

मोकळं आभळ पाहवत नाही. झाडाशिवाय त्याला करमत नाही. मोहाडीला त्याला जावे वाटायचे ते झाडांमुळेच. आपणही घर बांधू तेव्हा घराभोवती झाडे लावू असे स्वप्न उराशी बाळगून होता. कल्याणीच्या मळयात त्याने काळजी घेऊन अनेक झाडे जगवली होती. झाडाकडे पाहिले तरी त्याचे काळीज मोहरते. दिवस—दिवसभर झाडांना गोंजारत बसून तो वेळ घालवत असे. झाडावर असा त्याचा जीव जडला आहे. बिनझाडाचा बांध म्हणजे बिनकपडयाचा माणूस अशी त्याची धारणा आहे. जेव्हा जेव्हा वावरातले झाड तुटते तेव्हा तेव्हा तो आतून उद्ध्वस्त होतो.

वृक्षसंवर्धनाला, पर्यावरणाला चालना देणारे कितीतरी विचार 'बारोमास' मध्ये आलेले आहेत. त्याचे हे एक उदाहरण, ''त्यांच्या दारी झाडं होती त्यांनी आर्थिक अडचणीला बळी पडून विकली. आधी शेतातली. मग दारातली. खरं म्हणजे झाडांची खरी गरज शिवारालाच. तिथल्या मातीची धूप होऊ नये म्हणून. जमिनीचा पोत टिकून राहावा म्हणून झाडं हवीच''. (बारोमास, पृ.१०२)

शंकर सखाराम यांची 'एसईझेड' ही कादंबरी 'विशेष आर्थिक क्षेत्र' या प्रकल्पामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांवर आधारित आहे. नापीक, पडीक, जमिनी या प्रकल्पासाठी घेतल्या जातील, अशी घोषणा सरकारकडून केली जात होती, परंतु प्रत्यक्षात मात्र कोकणासारख्या हरित प्रदेशातील भूमी त्याकरिता संपादित केली जात होती. पर्यावरणीय दृष्टया समृध्द असा हा भूप्रदेश महामुंबई प्रकल्पाकरिता ( SEZ) आपले सौंदर्य व श्रीमंती हरवून बसणार याची जाणीव येथील भूमिपुत्रांना होते आणि त्याविरूध्द जनआंदोलन उभे राहते. हा या कादंबरीचा वर्णनाचा विषय आहे. महामुंबई प्रकल्प सुरू झाल्यावर मुंबई, नवी मुंबईत पिकतं आगर नष्ट करणारा हा रोग उरणवरून हळूहळू पनवेल, पेण संपवत अलिबागपर्यंत पोचणार याची जाणीव होऊन लेखकाने या विषयाला शब्दबध्द केले आहे.

कोकणच्या या समृध्द प्रदेशाची काही शब्दचित्रे शंकर सखाराम यांनी या कादंबरीत रेखाटली आहेत. ''गावदरणी तर वालपावटयाच्या फुलवानाने आणि भरल्या शेंगांनी भरून आलेली. शेतातील वाल, हरभरा, धणा यांच्या जोडीला बांधावरची तूर यांचा मिश्र वास. त्यात आजूबाजूचा काजू नुस्ता दणकता. आंब्याच्या मोहराने सारा आसमंत जागा केलेला. त्यातून पिटुकल्या कैऱ्या वाऱ्यावर झोके घेत्या. शेताच्या मेरेवरची पिवळी नक्षी नुस्ती पिवळीरंजन नवरी झालेली. शेजारची काटेरी सावर हातात लाल फुलांचे तबक घेऊन वसंतराजाचे स्वागत करण्यास तयार झालेली. सारीकडे नुस्ता घमघमाट''. (एसईझेड, पृ.४८) असा समृध्द प्रदेश 'विशेष आर्थिक क्षेत्रा' करिता नष्ट होऊ द्यायचा का हा प्रश्न ही कादंबरी उभा करीत राहते. एका अर्थाने हे पर्यावरण विचारांचे 'जागर' च होय.

प्रवीण दशरथ बांदेकर यांची 'चाळेगत' (२०१०) ही पहिलीच कादंबरी. कोकणच्या या लेखकाच्या कादंबरीत कोकण आणि समुद्र हा अनुभवाचा प्रदेश चित्रित झाला आहे. कोकण आणि समुद्राच्या पर्यावरणाला आता चूड लागत आहे, हे वास्तव 'चाळेगत' मधून समर्थपणे व्यक्त झाले आहे. या कादंबरीविषयीचे हरिश्चंद्र थोरात यांनी मांडलेले मत नेमकेपणाने याच वैशिष्टयाकडे लक्ष वेधते. थोरात लिहितात, ''मराठी कथनात्म साहित्यात समुद्र फारसा येत नाही. 'चाळेगत' मध्ये तो केंद्रस्थानी आहे आणि अत्यंत अभिनव पध्दतीने तो

साकार झाला आहे. समुद्राच्या आधारे जगणाऱ्या माणसांच्या जीवनातून तो व्यक्त होतो. यांत्रिक नौकांच्या बेलगाम मासेमारीमुळे विनाकारण मरणाऱ्या कासवांमधून आणि इतर जीवजंतूंमधून तो व्यक्त होतो'' समुद्र व समुद्रकाठच्या अवघ्या जीवनाचे, व्यापारी वृत्तीचे, चळवळीचे, राजकारणाचे, तिथल्या एकूणच उलथापालथीचे समग्र चित्रण या कादंबरीत येते.

'चाळेगत' मध्ये निसर्गसौंदर्य न्याहाळण्याची भूमिका नाही, तर निसर्ग व निसर्गसंपत्तीची जी विकासाच्या नावाखाली लूट चालू आहे त्याचे यथातथ्य व कलापूर्ण चित्रण आहे. मच्छीमारांच्या रोजच्या जगण्याचा प्रश्न आहेत, त्यांचे लढे आहेत. या दृष्टीने विराट दर्शन आहे. हरिश्चंद्र थोरात याबाबत म्हणतात, ''चाळेगत'मध्ये समुद्र येतो, समुद्रकिनारे येतात, किनारपट्टीचा उंचसखल प्रदेश येतो तो या ऐतिहासिक संदर्भात. डोळयांना सुखविणाऱ्या सुंदर गोष्टी अथवा नाटयमय घटनांना असलेली आकर्षक पाश्वभूमी म्हणून या गोष्टी या कादंबरीच्या संहितेत प्रवेश करीत नाहीत. साडेतीनशे पृष्ठांच्या या कादंबरीमध्ये कोकणच्या निसर्गसौंदर्याचे एकही वर्णन येत नाही.'' थोरातांचे हे मत योग्यच म्हणावे लागेल. कारण कोकण म्हटले की, निसर्गसौंदर्याचे वरदान लाभलेला भूप्रदेश. स्वाभाविकपणे त्याचे प्रतिबिंब लेखनात पडावे किंवा पडणारच ही अपेक्षा गैरवाजवी ठरू नये. परंतु पर्यावरणीय भान आलेल्या बांदेकरांसारख्या लेखकाचे डोळे या सौंदर्याकडे भाबडेपणाने वळण्याऐवजी तिथल्या विरूप पर्यावरणीय वास्तवाकडे लागले आहेत. कादंबरीच्या विकासवळणासाठी व पर्यावरणीय विचार संवर्धनासाठी हे मोठेच शुभवर्तमान म्हणावे लागेल.

समुद्रकिनारे प्रदूषित झालेले आहेत. सागरसंपत्तीचा बेसुमार विनाश होत आहे. पर्ससीनेटमुळे अनेक मत्स्यप्रजाती हळूहळू नष्ट होत आहेत. माधव गाडगीळ यांनी दिलेला एक जैवविविधतेच्या जतनाचा संदर्भ येथे लक्षणीय आहे. ते लिहितात, ''पावसाळा सुरू होता होता जे पहिले पूर येतात, त्यावेळी अनेक जातींचे मासे नदीओढयांत प्रवाहाविरूध्द पोहत जाऊन अंडी घालतात. अशा चढणीवरच्या माशांना पकडू नये असा रिवाज अनेक ठिकाणी प्रचलित होता. वन्यपशूंची शिकार करतानाही काळजी घेतली जायची. उदा : फासेपारधी जाळयात सापडलेल्या हरणांच्या गाभण माद्यांना सोडून देत असत. अशा निसर्गसंपत्तीचा विवेकाने वापर करण्याच्या पध्दतीच्या जोडीला निसर्गाचे, जैवविविधतेचे जतन करण्याच्याही अनेक परंपरा मोठया प्रमाणात प्रचलित होत्या''. आता हे पर्यावरणरक्षणाचे परंपरेतले शहाणपण लोपले. मानवी हव्यासवृत्तीने, व्यापारी दृष्टीकोनाने त्यावर आक्रमण केले. ट्रॉलर्स हे त्याचे प्रतीक अनून या कादंबरीत आले आहेत.

पर्यावरणीय जाणिवेशी विसंगत ठरावा, त्याला छेद दिला जावा असा एक प्रसंग 'चाळेगत' च्या संहितेत आला आहे. हत्तींचा कळप गावात घुसल्याचा एक प्रसंग 'चाळेगत' मध्ये चित्रित केला आहे. (चाळेगत, पृ.३०९--३१०) हे हत्ती गावात घुसतात आणि शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुसान करतात. अशा तक्रारीचा सूर या चित्रणातून व्यक्त झाला आहे. येथील शेतकरी, येथील माणूस सर्वच आघाडयांवर कसा पीडला जातोय, भरडला जातोय याचे अस्वस्थ करणारे चित्र साकारण्याच्या, कलानुभव प्रकट करण्याच्या प्रेरणेतून हे चित्रण केले गेले आहे, हे खरेच आहे. प्रतीकात्मकतेच्या दृष्टीने या चित्रणाकडे पाहिले तर ते योग्य ठरेल. ते कोकणच्या कुळवाडयांच्या, रहिवाशांच्या दृष्टीने न्याय्यक असेल परंतु वन्यजीवांवर ते अन्याय करणारे

आहे. पर्यावरणीय विचारांना व एकूणच पर्यावरणीय जाणिवेला ते छेद देणारे आहे. अशा चित्रणामुळे पर्यावरणीय जाणीव—जागृतीची वाट धूसर व बिकट होते, यात संदेह नाही.

'चाळेगत' ही प्रवीण दशरथ बांदेकर यांची कादंबरी पर्यावरणाच्या परवडीकडे गंभीरपणे पाहायला लावणारी एक सशक्त कलाकृती आहे. त्यातले अनुभवदर्शन पर्यावरणीय जाणिवेच्या दृष्टीने नवे आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासचक्रात किती वेगवेगळे घटक सक्रिय आहेत, अनुस्यूत आहेत, याचे समग्र आणि समर्थ आविष्कार या कादंबरीत पाहायला मिळते

**समारोप**

साठोत्तरी मराठी कादंबरातून विविध स्वरूपाच्या पर्यावरणीय अनुभवांना कादंबरीकारांनी व्यक्त केले आहे. पर्यावरण आणि माणूस यांच्यातील भावबंध, माणूस आणि प्राणी यांच्यातील आदिम प्रवृत्तीचे बंध, जीवाठायी असणारी प्रतिकूल पर्यावरणातही तग धरून राहण्याची जैविक ऊर्जा, आदिवसींचे निसर्गनिर्भर जीवन परस्पर सहकार्याने राहण्याचे त्यांचे शहाणपण, दगड—मातींचे, डोंगर—दऱ्यांचे, झाडा—वेलींचे, बकाल जीवनाचे, झोपड—वस्तींचे चित्रण, महानगरीय जीवनाचे नकोसे होणारे नित्याचे गजबजलेपण, ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषण, पाणी टंचाई हे प्रश्न असे अनेक स्वरूपाचे पर्यावरणीय प्रश्न, प्रदूषण, जंगलतोड, पर्यावरणनाशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, जंगलसौंदर्याचा तसेच जंगलनाशाचा विचार, कृषिजीवनाशी निगडित समृध्द पर्यावरण, जैवविविधता, पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत असणारी मानवाची नफेखोर वृत्ती, माणूस व पाळीव प्राण्यांतील नैसर्गिक स्नेह, मातीवर, पर्यावरणावर प्रेम करणाऱ्या व्यक्तिरेखा, असे नानाविध स्वरूपाचे पर्यावरणीय अनुभव मराठी कादंबरीतून प्रकट झाले आहेत. या अनुभवदर्शनाने पर्यावरणीय स्तिती—गतीचे चित्र उत्तम रीतीने स्पष्ट झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. मराठी कादंबरी : नव्या दिशा — डॉ. किशोर सावंत
२. ग्रामीण समाजजीवन व साहित्य : डॉ. गणेश देशमुख
३. मराठी प्रादेशिक कादंबरी — मदन कुलकर्णी — नागपूर
४. मराठी साहित्य समाज आणि संस्कृती — आनंद यादव
५. मराठी कांदबरी सृष्टी आणि दृष्टी — डॉ. सुहास पुजारी
६. बारोमास : एक अन्वयार्थ — प्रा. डॉ. विजय पाटील